**नियमीत दावा क्रमांक ७९५/२०२५**
**जुना क्रमांक ५११ / २०२१**
फातीमा वि. नबीलाल
CNR No. MHOS140009652025

## एकत्रीत आदेश निशाणी क्र. ६० व ६१ वर

१. अर्ज नि.क्र. ६१ नुसार प्रतिवादीने त्याचे वतीने अतिरिक्त पुरावा सादर करणेबाबत परवानगी मागितली आहे. अर्ज नि.क्र. ६० नुसार स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा परंडा येथील खाते क्र. ३२१३२४८७८८१ या खात्याचे सन २०१२ ते आजपावेतो खाते उतारा मागविणेबाबत विनंती केली आहे.

२. वादीतर्फे वर नमुद दोन्ही अर्जांवर लेखी म्हणणे देवून अर्ज मंजुर करणेस विरोध दर्शविला आहे.

३. उभय पक्षांचे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

४. संचिकेचे अवलोकन केले असता वादी व प्रतिवादी पक्षाचा तोंडी व कागदोपत्री पुरावा संपलेनंतर प्रकरण अंतीम युक्तीवादाकरीता नेमण्यात आले आहे. प्रकरणात अंतीम युक्तीवादासाठी असताना प्रतिवादीतर्फे प्रस्तुतचा अर्ज देण्यात आलेला आहे. अर्जात नमुद कारणांचा विचार केला असता प्रतिवादीस अतिरिक्त पुरावा सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देणे न्यायाचे दृष्टीने योग्य होणार आहे. सबब अर्ज नि.क्र. ६० व ६१ मंजुर होणेस पात्र आहेत. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज नि.क्र. ६० व ६१ मंजुर करण्यात येत आहे.

२. शाखा अधिकारी, स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा परंडा यांना आदेशीत करण्यात येते की, वादी सौ. फातिमा नबीलाल शेख हिचे नावे असलेले खाते क्र.

३२१३२४८७८८१ मध्ये प्रतिवादी नबीलाल शेख याने सन २०१२ ते माहे जानेवारी २०२६ पर्यंतचे जमा केलेल्या रकमेबाबतचा तपशील दर्शविणारा खातेउताराच्या प्रती या न्यायालयात दि. २०.०२.२०२६ रोजी किंवा पुर्वी दाखल करावेत.

३. प्रतिवादीस आदेशीत करण्यात येते की, साक्षी भत्ता न्यायालयात जमा करावा. तसेच खातेउतारा संदर्भात आवश्यक ती फीस स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा परंडा येथे जमा करावी.

ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH

Digitally signed by ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH
Date: 2026.02.13 12:44:32 +0530

दिनांकः १२.०२.२०२६

**(अ. अ. शेख)**

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, परंडा

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | Vaibhav Mohanrao Ingale<br>Stenographer (Grade-III) |
| Court | - | Civil Court Senior Division, Paranda. |
| Date | - | 12-02-2026 |
| Order signed by the presiding officer on | - | 12-02-2026 |
| Order uploaded on | - | 13-02-2026 |